[illegible]
जिल्हा परिषद, चंद्रपूर
ई-मेल पत्ता : nbazpchandrapur@gmail.com, tsczpchandrapur@gmail.com
Ph. 07172 - 299455

चंद्रपूर
आय.एस.ओ. ९००१:२००० प्रमाणीत

क्र.जिपास्वमि/जिकाव्य/वाहन/290/2026 दिनांक 09 /04/2026

-----------------------------------
-----------------------------------

विषय : वाहन उपलब्ध करून देण्याबाबत दरपत्रक सुचना .

उपरोक्त विषयान्वये जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष, जि.प. चंद्रपूर अंतर्गत जल जीवन मिशन च्या कामाचे प्रभावी अंमलबजावणी करण्याकरीता जिल्हयात वेळोवेळी कामांची तपासणी, गुणवत्ता, बांधकाम पाहणी, इ. बाबत दौरे करण्याकरीता या कार्यालयास ०१ वाहनांची आवश्यकता आहे.

तरी जिल्हा कक्षास आवश्यक असलेले ०१ वाहने मासिक भाडेतत्वावर उपलब्ध करून देण्याबाबत खाली दिलेल्या नमुन्यात दरपत्रक दिनांक२० /०४/२०२६ रोजी सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत या कार्यालयास सादर करावे.

| अ.क्र. | योजनेचे नाव | वाहनाची प्रकार | वाहनांची संख्या | वाहनांचा कालावधी | वाहनाचे दर |
|---|---|---|---|---|---|
| १. | जल जीवन मिशन | ०६ आसनी वाहन (स्कॉर्पिओ, बोलेरो सन २०२४ नंतरचे टॅक्सी परमिट असावे) वाहन चालक, इंधन, टोल टॅक्स, सर्व करासह | ०१ | १ मे २०२६ ते ३१ मार्च २०२७ पर्यंत | |

उपरोक्त आपले दर बंद लिफाफयात सोबत जोडलेल्या अटी व शर्ती मान्य असल्यास दिनांक २०/०४/२०२६ रोजी सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष, जि.प. चंद्रपूर येथे पोहचता करावे. उशिरा प्राप्त झालेल्या दरपत्रकाचा स्विकार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**सोबत — अटी व शर्ती.**

**प्रकल्प संचालक, जल जीवन मिशन**
**जिल्हा परिषद, चंद्रपूर**

प्रतिलिपी-
1)मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परीषद,चंद्रपुर यांना माहीतीस सवीनय सादर.
2)मा.उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) जिल्हा परीषद,चंद्रपुर यांना माहीतीस तथा सदरची दरपत्रक सुचना जिल्हा परीषद चंद्रपुर चे संकेतस्थळावर सुचना कालावधी मध्ये प्रसिद्ध करण्याबाबत विनंती करण्यात येत आहे.

O/C 09/04/26
आवक विभाग
सा.प्र.वि. जि.प. चंद्रपूर

**प्रकल्प संचालक, जल जीवन मिशन यांचे कार्यालय**
**जिल्हा परिषद, चंद्रपूर**
**ई-मेल पत्ता :** nbazpchandrapur@gmail.com, tsczpchandrapur@gmail.com
Ph. 07172 - 299455

## अटी व शर्ती :

१) प्राप्त दरपत्रके जिल्हा पाणी वस्वच्छता मिशन कक्ष, जि.प. चंद्रपूर यांचे कक्षात दिनांक /०४/२०२६ रोजी सायंकाळी ४.३० वाजता अथवा सक्षम अधिकारी ठरवितील त्या दिवशी उघडण्यात येईल.

२) वाहन हे सन २०२४ किंवा पुढील वर्षात निर्मित असणे आवश्यक आहे.

३) दरपत्रकासोबत वाहनाचे RC Book, ग्राहय असलेले इन्शुरन्स, पीयुसी, वाहन मालकांचे पॅनकार्ड, इ. आवश्यक दस्ताऐवज झेराक्स सत्यप्रत जोडावी.

४) वाहन पूर्ण काळ जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष, जि.प. चंद्रपूर यांचे परवागनी शिवास जि.प. शासकीय परिसरातून वाहन दुरूस्ती तथा इतर कामांकरीता बाहेर नेता येणार नाही.

५) वाहनाचे दर हे वाहन, इंधन, किरकोळ व मोठी सर्व दुरूस्ती वाहन चालकाचे वेतन व भत्त्यावरील खर्च इत्यादी सर्व खर्चासहीत राहील. वाहनाचा मेंटन्सस सर्व्हीसिंग इत्यादी करीता कार्यालयीन सुटटीच्या दिवशी आवश्यकतेनुसार वाहन तात्पूरते मुक्त करता येईल व त्या करीता होणारी वाहन धाव भाडे मागणीसाठी हिशोबी घेतली जाणार नाही.

६) दौऱ्याचे वेळी ठिकठिकाणाचा द्यावयाचे टोलटॅक्स इत्यादीचा अधिभार वाहन पुरवठाधारकाकंडे राहील व त्या देयकाची प्रतिपूर्ती कार्यालयमार्फत देय राहणार नाही.

७) वाहनाचा वापर ग्रामीण भाग, डोंगराळा व अति दुर्गम आदिवासी भागात केल्या जाईल.

८) आवश्यकता भासेल तेव्हा वाहनास योजनेविषयी बॅनर, पोस्टर व स्टिकर लावण्यात येईल. याबाबत वाहनामालकाची वेगळी संमती घेतली जाणार नाही.

९) वाहन नेहमी सुस्थितीत राहील .किरकोळ अथवा मोठया स्वरुपाची दुरुस्ती करण्यास पुरवठादार जवाबदार राहील . किरकोळ स्वरुपाची दुरुस्ती एक दिवसांत तर मोठया स्वरुपाची दुरुस्ती तीन दिवसांत करुन देण्याची जबाबदारी पुरवठाधारकाची राहील.

१०) वाहनाचे दुरूस्तीचे कालावधीत दुसया वाहनाची त्वरीत पर्यायी व्यवस्था करून देण्याची जबाबदारी पुरवठाधारकांची - .राहील

११) वाहन चालकाच्यामालकांच्या अकार्यक्षमतेमुळे वाहन बंद स्थितीत राहील्यास शासकीय कामावर अनिष्ट परिणाम / झाल्यास एका महिण्याला वाहनाच्या वापराची जी रक्कम येईल त्याची प्रति दिवस सरासरी लक्षात घेवून तेवढी रक्कम त्या कालावधीकरीता मासिक भाडयाचे रकमेतून कपात करण्यात येईल.

१२) वाहनाचे सर्व दस्ताऐवजतसेच पुरवठा आदेश प्राप्त तसेच तसेच .नियमाप्रमाणे अद्यावत ठेवावे लागेल ट . वाहनाचे सर्व मूळ दस्ताऐवज जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष, जिल्हा परीषद, चंद्रपूर यांचे कार्यालयात दाखवून तपास घ्यावी.

१३) दरपत्रकामधे जे वाहन क्रमांक दर्शविण्यात येईल तेच वाहन आदेश मिळाल्यानंतर कार्यालयात कार्यरत राहीलकाही . पूर्वपरवानगी घ्ावी लागेल.

१४) वाहनाची मासिक किविहीत शासन नि म.ची मर्यादा ही विहीत मर्यादेपेक्षा अधिकची झाल्यास अधिकचे कि .मी.यम परिपत्रकानुसार प्रती किचे दर अथवा सक्षम अधिकारी वाटाघाटी करून ठरव .मी.तील ते दर लागु राहील.

१५) वाहन दुरुस्तीकरीता अथवा इंधनाकरीता चंद्रपूर मुख्यालयाबाहेर किंवा इतरत्र नेणे आवश्यक असल्यास त्यासाठी होणारी धाव ग्राहय धरल्या जाणार नाही.

१६) सदरहू व्यवहारासंबंधी काही कारणास्तव अथवा वरील अटी व शर्तीचा भंग केल्यास विधिवत कार्यवाही करण्याची वेळ आल्यास अथवा सदरहू प्रकरण न्यायप्रविष्ठ झाल्यास त्याची मर्यादा चंद्रपूर न्यायालयापर्यंत मर्यादित राहीलयाप्रकरणी . .होणारा खर्च आपल्या अनामत रकमेतून वसूल केला जाईल

१७) कंत्राटाचा कालावधी कमी करणे अथवा वाढविणे अथवा कोणतेही कारण न दर्शविता वाहने बंद करणे या विषयीचे अधिकार जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष, जिल्हा परीषद, चंद्रपूर यांना राहील.

१८) पुरवठा आदेश मिळाल्यापासून आदेशित वाहनाचा पुरवठा ०३ दिवसाचे कालावधीत होणे आवश्यक आहे.

१९) वरील अटि व शर्ती मान्य असल्याबाबतचे ०३ दिवसाचे आत रू .१००/- चे स्टॅम्प पेपरवर करारनामा करून देणे बंधनकार राहील.

**प्रकल्प संचालक, जल जीवन मिशन**
**जिल्हा परिषद, चंद्रपूर**